# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### गोरेगाव (पूर्व) (मुंबई) आरे दुग्ध वसाहतीमधील, दुग्ध विकास विभागाच्या मालकीच्या ३२०० एकर जागेपैकी, भाडेपट्टा करार संपुष्टात आलेल्या खाजगी संस्थांकडून भूखंड ताब्यात घेण्याबाबत

**(१) ८५१८२ (१४-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर गोरेगाव (पूर्व), आरे दुग्ध वसाहतीमधील, ३२०० एकर जागेत, शासकीय, निमशासकीय तथा अनेक खाजगी संस्थांना, दिलेल्या जमिनीचा भाडेपट्टा करार संपुष्टात येऊनही अद्याप सदर भूखंड शासना ताब्यात घेण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या दुग्धविकास विभागाने, एकूण किती भूखंड भाडेपट्टयाने, केव्हापासून, कोणत्या संस्थांना दिल्या आहेत व त्याचा भाडेपट्टा कोणत्या दिनांकास संपुष्टात आला आहे,

(३) असल्यास, भाडेपट्टा संपुष्टात आलेले एकूण किती भूखंड आहे, व त्यापैकी किती भूखंड शासनाने अद्यापपर्यंत ताब्यात घेतले आहेत, व किती भूखंड अद्याप ताब्यात घेणे बाकी आहे,

(४) असल्यास, ३२०० एकर जागेपैकी, साधारणत: एकूण किती एकर जागेवर, अतिक्रमण झाले आहे व सदरहू भूखंड अतिक्रमण मुक्त करण्याच्या दृष्टीने, अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०१-०१-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) दुग्धविकास विभागाने एकूण ११ जागा भाडेपट्ट्याने दिलेल्या आहेत. त्यापैकी १ जागेचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. (सविस्तर तपशिल सोबत जोडला आहे.)

(३) भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या जमीनीपैकी मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या आरे मत्स्यबिज केंद्राकरीता देण्यात आलेल्या १० एकर ८ गुंठे २२ आणे जमीनीचा भाडेपट्टा संपुष्टात आला आहे. सदर जागेच्या भाडेपट्टा मुदतवाढीबद्दल कार्यवाही चालु आहे.

(४) आरे दुग्ध वसाहतीमध्ये होणाऱ्या अनधिकृत झोपड्यांच्या बांधकामाचे/अतिक्रमणाची मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे अंतर्गत सुरक्षा विभागामार्फत सतत निष्कासन कार्यवाही केली जाते. यापूर्वी शासन निर्णय क्र. एएमसी-१००६/८१२४/प्र.क्र.५८/पदुम८ दि.२८.०६.२००६ अन्वये आरे दुग्ध वसाहतीमध्ये विविध ४६ ठिकाणी अंदाजे १८० एकर जमीनीवर वसलेल्या झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्याकरीता मौजे पहाडी गोरेगांव सि.टी.एस. क्र. ५८९ अ मधील ३३.६ एकर जमीन मे. बामकोटेक प्रा.लि. यांना देण्यात आलेली आहे. तथापि याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायालयीन प्रकरण क्रमांक पी.आय.एल.क्र.१५५/२००६ अन्वये याचिका दाखल आहे. त्यामुळे दुग्ध वसाहतीमधील उपरोक्त झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय, यांच्या अध्यक्षतेखाली दि.११/०५/२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये आरे दुग्ध वसाहतीतील आदिवासी पाडे तसेच बिगर आदिवासी झोपडपट्ट्यामधील पात्र लाभार्थींचे सर्व्हेक्षण मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी तातडीने करुन पुनर्वसन प्रकल्पासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चाची परिगणना करुन योजनेचे प्रारुप तयार करावे. या प्रयोजनार्थ गृहनिर्माण विभागाने कार्यान्वयन यंत्रणा (नोडल एजन्सी) म्हणून काम पाहावे. पुनर्वसन प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यासाठी स्थानिक पातळीवरील आवश्यक ती माहिती आयुक्त दुग्धव्यवसाय विकास व मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांनी झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणास तातडीने उपलब्ध होईल याबाबत दक्षता घ्यावी असे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मळवंडी-ठुले (ता.मावळ) प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी ६५% रक्कम सन २००५ मधे शासनाकडे भरूनही पुनर्वसनास पात्र असलेल्यांचे अद्यापही पुनर्वसन न झालेबाबत**

**(२) ९२४४२ (२२-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मळवंडी-ठुले (ता.मावळ) प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी ६५% रक्कम सन २००५ मध्ये शासनाकडे भरूनही पुनर्वसनास पात्र असलेल्या श्रीमती सिंधुताई मारुती ठुले रा.मळवंडी ठुले (ता.मावळ) यांचे अद्यापही पुनर्वसन झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३० ऑगस्ट, २००० रोजी मळवंडी ठुले प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा येथे झालेल्या बैठकीत मळवंडी ठुले प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन चास कमान लाभक्षेत्रात करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीतील झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्रीमती सिंधुताई मारुती ठुले यांच्या मागणीनुसार चासकमान लाभक्षेत्रातील मौजे दिंग्रजवाडी (ता.शिरूर) येथील पुनर्वसनासाठी राखीव जमीन गट नं. २३९ मधील जागा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०१-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) श्रीमती सिंधुताई मारुती ठुले यांना मौजे काळुस, ता.खेड येथे पर्यायी जमीन देण्याबाबत दि. ११.४.२०१७ च्या शासन पत्रान्वये मंजूरी देण्यात आली आहे. तथापि, अर्जदार यांचे विनंतीनुसार जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयाकडून दि. ५.१०.२०१७ च्या पत्रान्वये शासनास सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाला असून, यथायोग्य निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.नळेगाव (ता.चाकूर) व किनगाव (ता.अहमदपूर) येथील बस स्थानकावर अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करणेबाबत**

**(३) ९४८११ (१५-०९-२०१७). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. नळेगाव (ता.चाकूर) हे २५००० वस्तीचे गाव असून किनगाव (ता.अहमदपूर) हे देखील मोठ्या बाजार पेठेचे गाव आहे, परंतु या दोन्ही गावातील बस स्थानकावर कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बस स्थानकाच्या परिसरातील २५ ते ३० गावाचे संपर्काचे ठिकाण असल्यामुळे येथे अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावांमध्ये अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या नळेगाव बसस्थानकावर प्रवाशांना पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह इ. सुविधा उपलब्ध असून, बसस्थानक सद्या सुस्थितीत आहे. तसेच, किनगाव बसस्थानकाचे आधुनिकीकरण व सुशोभीकरण करावयाच्या कामाची ई-निविदा महामंडळाद्वारे काढण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन विभाग लातूर अंतर्गत बस वाहतुकीच्या वेळेत बदल केल्याने विद्यार्थ्यांची व प्रवाशांची गैरसोय झाल्याबाबत**

**(४) ९४९६४ (२२-०९-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा आगाराची मुरुड ते औसा मार्गे वडजी राज्य परिवहन विभाग, लातूर अंतर्गत बस सेवेच्या मार्गात बदल केल्याने मौजे वडजी (ता.औसा) येथील विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याने बससेवा पूर्ववत मार्गानुसार व वेळेनुसार सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिंनी आगार प्रमुख औसा यांच्याकडे दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बस सेवेच्या मार्गात अचानक बदल करण्याची कारणे काय आहेत व सदर बस सेवा पूर्ववत मार्गानुसार व वेळेनुसार सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) व (२) होय.

तथपि, राज्य परिवहन महामंडळाद्वारे चालविण्यात येणाऱ्या औसा ते मुरुड या बसफेरीच्या मार्गात कोणताही बदल करण्यात आलेला नसून, जागजी या गावातील विद्यार्थ्यांची मागणी असल्यामुळे सदर बसफेरी मुरुडच्या पुढे फक्त ०९ कि.मी. पर्यंत विस्तारीत करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर, मनमाड, निफाड आणि चांदवड (जि.नाशिक) येथील एस.टी. बस आगारात पुरेश्या प्रमाणात स्वच्छतागृहे नसल्याबाबत**

**(५) ९५०३८ (२७-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर, मनमाड, निफाड आणि चांदवड (जि.नाशिक) येथील एस.टी. बस स्थानकांत महिला व पुरषांसाठी पुरेश्या प्रमाणात स्वच्छतागृहे नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सिन्नर, मनमाड, निफाड आणि चांदवड एस.टी बस स्थानकात महिला व पुरुषांसाठी स्वच्छता गृहाची पुरेश्या प्रमाणात उभारणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागातील सिन्नर, मनमाड, निफाड व चांदवड या बसस्थानकांमध्ये पुरेशा प्रमाणात महिला व पुरुषांसाठी स्वच्छतागृहे उपलब्ध आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पशुगणना यंत्राअभावी रखडल्याबाबत

**(६) ९५१३६ (२९-१२-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १५ ऑक्टोबरपासून पशुगणना सुरु करण्यात येणार होती परंतु यंत्राअभावी पशुगणना रखडल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यात शासनाकडून टॅब उपलब्ध न झाल्याने पशुगणना लांबली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, टॅब मिळेपर्यंत पशुगणना करण्यात येऊ नयेत, असे आदेश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पशुगणनाकरिता टॅब देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२२-०१-२०१८) :** (१) व (२) केंद्र शासनाने दिनांक १३.४.२०१६ च्या पत्रान्वये २० वी पशुगणना देशपातळीवर दिनांक १६ जुलै, २०१७ ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत करण्याचे निर्देश दिले. तसेच, सदर पशुगणना राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान या कार्यक्रमाअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या टॅबलेटद्वारे करण्यात यावी असे निर्देश केंद्र शासनाने दिनांक २०.४.२०१७ च्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे दिलेले आहेत.उक्त कार्यक्रमांतर्गत सदरचे टॅबलेट खरेदी करण्याची कार्यवाही महाआयटी महामंडळ व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ यांच्यामार्फत सुरू आहे.

(३) केंद्रशासनाने दिनांक १३.६.२०१७ च्या पत्रान्वये प्रथम टॅबले खरेदी प्रक्रीया पूर्ण करण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिलेल्या आहेत.

(४) व (५) सदर खरेदी प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर केंद्रशासनाच्या पशुसंवर्धन विभागाकडून आवश्यकत्या सूचना प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष पशुगणनेची कार्यवाही सुरू करण्यात येईल.

---

## राज्यातील ३८ शासकीय दुध योजना व ८१ शीतकरण केंद्रांचे खाजगीकरण करण्याचा प्रस्तावाबाबत

**(७) ९५६१५ (२९-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३८ शासकीय दुध योजना व ८१ शीतकरण केंद्रांचे १३ हजार एकर जमिन आणि १४ हजार कर्मचाऱ्यांसह खाजगीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे खाजगीकरण केल्यास खाजगी दुध संस्थांकडून दुध खरेदी करताना शेतकऱ्यांची फसवणूक केली जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती खासगी सार्वजनिक सहभागाच्या तत्वावर पुनरुज्जीवन करण्याबाबत तसेच शासनाने सदर प्रस्ताव मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२३-०२-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सार्वजनिक-खाजगी सहभाग (पीपीपी) तत्वावर शासकीय दूध योजना पुनर्जिवित करण्यासाठी व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून अहवाल सादर करण्यासाठी तांत्रीक सल्लागाराची नियुक्ती करण्यास दि.२८/११/२०१७ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय दुधयोजना शितकरण केंद्र, शासकीय दुध योजनांची जमीन व कर्मचारी यांचे खाजगीकरण करण्याचे शासनाचे धोरण नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात एस.टी महामंडळाने तसेच खाजगी ट्रॅव्हल्सनी केलेली भाववाढ**

**(८) ९५६३१ (२७-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एस.टी महामंडळाने भाड्यात १० ते २० टक्के वाढ केली तर खाजगी वाहतुकदारांनी नुकत्याच झालेल्या दिवाळी सणादरम्यान दुपटीने भाडेवाढ केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती प्रवाशांना जादाचा भुर्दंड पडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१), (२) व (३) गृह विभागाच्या दि.२०.१०.२००६ च्या अधिसूचनेन्वये यात्रा, सणासुदीचा काळ, सुट्या, सप्ताह अखेर अधिकतम गर्दी किंवा घाईगर्दीचा कालावधी यादरम्यान राज्य परिवहन प्राधिकरणाने देण्यात आलेल्या मान्यतेप्रमाणे तीस टक्के इतक्या मर्यादेपर्यंत भाडेवाढ करण्यास परवानगी दिली आहे. त्यास अनुसरुन राज्य

परिवहन महामंडळाने दिवाळी गर्दीचा हंगाम, दि.१६.१०.२०१७ ते दि.३१.१०.२०१७ या कालावधीत साध्या सेवेसाठी १०%, निमआराम सेवेसाठी १५% व वातानुकुलीत सेवेसाठी २०% इतकी परिवर्तनशील भाडेवाढ केली होती. दि.०१.११.२०१७ पासून सदरची भाडेवाढ रद्द करुन मूळ दराने भाडे आकारणी करण्यात येत आहे.

दि.१६.१०.२०१७ च्या मध्यरात्रीपासून राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांनी वेतनवाढीच्या मागणीसाठी संप पुकारला होता. सदर संपकालावधीत प्रवासी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी गृह विभागाच्या दि.१६.१०.२०१७ च्या अधिसूचनेन्वये राज्यातील सर्व खाजगी प्रवासी बसेस, स्कुल बसेस, कंपन्यांच्या मालकीच्या बसेस व मालवाहू वाहन यांना प्रवासी वाहतूक करण्यास मान्यता देण्यात आली होती. सदरची मान्यता महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी संप मागे घेताच रद्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई नेरूळ येथे नविन एस.टी. डेपो बांधण्याबाबत**

**(९) ९५६५१ (२९-१२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराची निर्मिती होऊन जवळपास ३५ वर्षाचा कालावधी उलटूनही तसेच लोकसंख्या १४ लाखाच्यावर गेली असतांना देखील नवी मुंबईकरांसाठी वाशी येथे एकच एस.टी.डेपो अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकच एस.टी.डेपोमुळे बाहेरगावी जाणाऱ्या नवी मुंबईकरांना तासनतास ताटकळत उभे रहावे लागते त्यामुळे नागरिकांचे विशेषतः महिला, लहानमुले व जेष्ठ नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नेरूळ येथे एस.टी.डेपो उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.परिवहन मंत्री महोदयांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनावर नेरूळ येथे एस.टी.डेपो उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) व (२) नाही.

वाशी येथे राष्ट्रीय महामार्गावर व सेक्टर-९ याठिकाणी राज्य परिवहन महामंडळाचे प्रवाशी शेड असून, त्यामध्ये वाहतूक नियंत्रक कक्ष आहेत. वाशी व मुख्य बसस्थानकांतून दैनंदिन ६७० बसेस मार्गस्थ होत असून, प्रवाशांना पुरेशा बसेस उपलब्ध होत आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत नाही.

(३) होय.

(४) नेरुळ हे ठिकाण राष्ट्रीय महामार्गावर असून सदर ठिकाणापासून कुर्ला नेहरुनगर आगार १६ कि.मी. अंतरावर व पनवेल आगार १८ कि.मी. अंतरावर असल्याने नेरुळ येथे नवीन आगार उभारण्याची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील संभाजी नगर येथील बसपोर्टच्या कामाबाबत**

**(१०) ९५६६४ (२७-१२-२०१७). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परिवहन विभागामार्फत १३ जिल्हयांमध्ये राबविण्यात येणाऱ्या बसपोर्ट योजनेत कोल्हापूर जिल्हयातील संभाजी नगर या बस डेपोचा समावेश असून अद्याप त्या ठिकाणी बसपोर्ट बाबतच्या कोणत्याच कामांना गती प्राप्त न झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संभाजी नगर येथील बसपोर्टच्या कामांना गती मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यात १३ ठिकाणी प्रस्तावित करण्यात आलेल्या बसपोर्ट प्रकल्पामध्ये कोल्हापूर विभागातील संभाजीनगर येथील बसस्थानकाचा समावेश करण्यात आला होता. तथापि, उपलब्ध क्षेत्रफळ, बसेसची दैनंदिन आवक-जावक, प्रवासी वर्दळ व वाणिज्य उपलभ्यता (कमर्शिअल पोटेन्शिअल) या बाबी विचारात घेवून राज्य परिवहन महामंडळाद्वारे बसपोर्ट प्रकल्प संभाजीनगर बसस्थानक ऐवजी कोल्हापूर मध्यवर्ती बसस्थानक या ठिकाणी प्रस्तावित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील दादर येथील एस.टी.च्या दादर एशियाड स्टॅंड बंद करण्यात आल्याबाबत**

**(११) ९५७४४ (२७-१२-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादर येथील एस.टी.च्या दादर एशियाड स्टॅंडला पालिकेने जागा रिक्त करण्याचे पत्र दिले आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या एस.टी. स्टॅंडवरुन दिवसाला सुमारे १२ हजार प्रवासी ये-जा करत असून एसटीला मोठी आर्थिक सहाय्य मिळत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील एस.टी स्टॅंड बंद झाल्यास वा अन्यत्र स्थलांतरित झाल्यास त्यांच्या वाहतूक सेवेवर मोठा परिणाम होऊन एसटी महामहामंडळा मोठी तूट निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने प्रवाशांच्या सोयीसाठी असणारा सदरील एस.टी.चा थांबा येथून हलू नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१), (२) व (३) होय.
(४) सदर एस.टी. बस थांबा हलवू नये याकरिता राज्य परिवहन महामंडळाद्वारे परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य व मुंबई महानगर पालिका यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुरु करण्यात आलेली बस दर शनिवारी सुरु ठेवण्याबाबत

**(१२) ९५८३० (२९-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुरु करण्यात आलेली बस प्रत्येक शनिवारी बंद ठेवल्या जात असल्याने तोरणडोंगरी, श्रीभूवन, खुंटविहीर करंजुल वाळूठझिरा, उंबरठाण बर्डीपाडा, बाळओझर, खोकरविहीर आदि ठिकाणी बस जात नसल्याने शालेय विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर दिवसाप्रमाणे दर शनिवारी बस सुरु ठेवून विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळावे अशी मागणी विद्यार्थी संघटनेने तहसिलदार कळवण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती दर शनिवारी बस सुरु ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) नाही.
राज्य परिवहन महामंडळाद्वारे कळवण तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या मानव विकास योजनेंतर्गतच्या बस फेऱ्या शनिवारी प्रथम सत्र शाळा सुरु असल्यामुळे सकाळ सत्रातील मानव विकास फेऱ्या पूर्ण क्षमतेने चालनात आहेत. मात्र शनिवारी दुपार सत्रात शाळांना सुट्टी असल्याने व विद्यार्थी वाहतूक नसल्याने दुपार सत्रातील फेऱ्या सुरु ठेवणे संयुक्तिक वाटत नाही.
(२) होय.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्डावर (एनएचबी) मिळणाऱ्या हरितगृह अनुदानासाठी पाठविलेले प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१३) ९६०३६ (२७-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्डावर (एनएचबी) मिळणाऱ्या हरितगृह अनुदानासाठी पाठविलेल्या प्रस्तावापैकी ७० प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हरितगृह योजनेसाठी (एनएचबी) गुजरात, मध्यप्रदेश आणि विदर्भाचा अपवाद वगळता महाराष्ट्र राज्याला अपुऱ्या निधीचे कारण देवून वगळले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखीत योजनेच्या अटी, शर्थी व निकष काय निश्चित करण्यात आले आहेत,
(५) असल्यास, प्रश्न भाग (१) मध्ये नमूद केलेले व एनएचबी असलेल्या ७० प्रस्तावाला मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०१-०३-२०१८) :** (१) व (२) नॅशनल हॉर्टीकल्चर बोर्ड हे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. सदर बोर्डाकडून करण्यात येणारी कार्यवाही केंद्र शासनाशी संबंधित आहे.
(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कागल (जि.कोल्हापूर) तालुक्यात पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे गेल्या अनेक वर्षापासून रिक्त असल्याबाबत

**(१४) ९६४०८ (२९-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कागल (जि.कोल्हापूर) तालुक्यात पशुसंवर्धनाला चालना देण्याचे दृष्टीने श्रेणी-१ चे ९ आणि श्रेणी-२ चे ८ असे एकूण १७ पशुवैद्यकीय दवाखाने अस्तित्वात असले तरी बाचणी, सांगाव, सोनगे, लिंगनूर, कापशी, केनवडे येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे गेल्या अनेक वर्षापासून रिक्त असून काही ठिकाणी प्रभारी अधिकारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुवैद्यकीय अधिकारी नसल्याने पशुपालकांना खाजगी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून जनावरांवर उपचार करुन घ्यावे लागत असल्याने त्यांचा आर्थिक बोजा शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, बिगर आदिवासी क्षेत्रासाठी तत्कालीन पशुसंवर्धन राज्यमंत्री यांनी केनवडे येथे रु. २५ लाख रुपये खर्च करुन अद्ययावत स्वरुपाच्या बांधलेल्या दवाखान्यातील सोनोग्राफी मशिनचा वापर होत नसल्याने ते बंद पडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत, शेतकऱ्यांना खाजगी पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांकडून जनावरांवर उपचार घेण्यात झालेला खर्च भरुन देण्याबाबत तसेच सोनोग्राफी मशिनचा वापर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०२-२०१८) :** (१) व (२) कोल्हापूर जिल्हयातील कागल तालूक्यात श्रेणी-१ चे ९ व श्रेणी-२ चे ८ असे एकूण १७ पशुवैदयकीय दवाखाने आहेत. सदर दवाखान्यांकरीता ३८ पदे मंजूर असून त्यापैकी ३२ भरलेली व ६ पदे रिक्त आहेत.

पशुवैदयकीय दवाखाना बाचणी, सांगाव, सोनगे, लिंगनूर, कापशी व केनवडे येथील पशुवैदयकीय अधिकाऱ्यांची पदे सेवानिवृती व बदली कारणांमुळे रिक्त झालेली असली तरी रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपवून पशुपालक धारक शेतकऱ्यांच्या जनावरांना नियमितपणे वैदयकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
(३) व (४) हे खरे नाही, कागल तालुक्यातील पवैद श्रे-१ केनवडे येथे सोनोग्राफी मशीनचा पुरवठा करण्यात आलेला नाही. तथापि, पवैद श्रे-१ लिंगनूर व म्हाकवे या केंद्रातील सोनोग्राफी मशिनव्दारे पवैद श्रे-१ केनवडे दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील जनावरांची तपासणी केली जात आहे.
(५) पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा भरतीने व पशुधन विकास अधिकारी, गट-ब या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क संवर्गातील

रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पदांच्या उपलब्धतेनुसार कागल तालुक्यातील पशुवैदयकीय दवाखान्यातील रिक्त पदे भरण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरे दूध डेअरीला उर्जितावस्थेत आणण्याबाबत

**(१५) ९६४४३ (२९-१२-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात दूध मिळावे यासाठी आरे डेअरीची स्थापना झाली, तथापी गेल्या काही वर्षापासून आरेचे दूध उत्पादन व वितरण कमी कमी होत चालले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ मध्ये तर अभूतपूर्व अशी आरेच्या दुधाची टंचाई मुंबईत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरे डेअरी उर्जितावस्थेत आणण्यासाठी मा. दुग्धविकास मंत्री यांच्या समवेत दूध वितरकांनी अनेक बैठका घेऊन व त्यांना निवेदने देऊन अनेक उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापही आरे दूध डेअरीला उर्जितावस्था प्राप्त झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आरे दूध डेअरीला उर्जितावस्थेत आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२३-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे,

(४) व (५) सार्वजनिक-खाजगी सहभाग (पीपीपी) तत्वावर शासकीय दूध योजना पुनर्जिवित करण्यासाठी व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून अहवाल सादर करण्यासाठी तांत्रीक सल्लागाराची नियुक्ती करण्यास दि.२८/११/२०१७ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहर राज्य परिवहन मंडळाच्या बससेवेच्या कपात केलेल्या फेऱ्या पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(१६) ९६४८६ (२७-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर राज्य परिवहन मंडळाच्या बससेवेच्या कपात केलेल्या फेऱ्या पूर्ववत सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नादुरुस्त बसेस व सक्तीच्या रजेच्या विरोधात एस.टी. कर्मचाऱ्यांनी आक्रमक होवून दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी नाशिक शहरातील बससेवा बंद पाडून आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक शहरातील शालेय विद्यार्थी, कामगार व प्रवाशांचे अतोनात होत असलेले हाल दूर करण्यासाठी नाशिक शहरातील बससेवेच्या फेऱ्या पूर्ववत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) राज्य परिवहन महामंडळाद्वारा दि.१५.०६.२०१७ पासून नाशिक शहर वाहतूकीची १० नियते, १६० फेऱ्या व २०१५ कि.मी. तसेच, भगूर ते महात्मानगर अशी फेरी सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूरातील एसटी महामंडळाच्या गणेशपेठ बसस्थानकांवर प्रवाशांसाठी सोयीसुविधा पुरविण्याबाबत**

**(१७) ९६६३७ (२९-१२-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरातील एसटी महामंडळाच्या गणेशपेठ बसस्थानकांवर महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कामचुकारपणामुळे प्रवाशांना मुलभूत सुविधा मिळत नसल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ च्या शेवटी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गणेशपेठ बसस्थानकांवर पसरलेला कचरा, प्रवाशांना बसण्याकरीता असलेल्या सिमेंटच्या बाकांजवळ साचलेली घाण, बंद अवस्थेत असलेले पंखे, पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी साचलेली घाण, प्लॅटफॉर्मच्या जवळ फिरत असलेली मोकाट कुत्री, परिसरात साचलेले कचऱ्यांचे ढिग याकडे महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे नेहमीचे होत असलेल्या दुर्लक्षामुळे प्रवाशांची नेहमीची हेळसांड होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूरातील एसटी महामंडळाच्या गणेशपेठ बसस्थानकांवर प्रवाशांसाठी सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) व (२) नाही.
(३) गणेशपेठ बसस्थानकात प्रवाशांकरीता आसन, प्रतिक्षालय, आरक्षण, विद्यार्थी पास, चौकशी कक्ष, लाईट, पंखे, इ. व्यवस्थेसह पिण्याचे पाणी, उपहारगृह, प्रसाधनगृह याची सोय उपलब्ध आहे. तसेच, बसस्थानकावरील खड्डे डांबरीकरणाने भरुन घेण्यात आलेले आहेत.

बसस्थानक व वाहनतळाची स्वच्छता दि.०२/१०/२०१७ पासून ब्रीक्स इंडिया प्रा.लि. यांचेमार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यात पशूसंवर्धन व दुग्ध व्यवसायामध्ये वळू संगोपन केंद्रात पदे रिक्त असल्याबाबत

**(१८) ९६७९० (२९-१२-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसायामध्ये वळू संगोपन केंद्रात ५० पैंकी तब्बल २२ पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचा विपरित परिणाम येथील कामकाजांवर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन येथील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) वळू माता प्रक्षेत्र, हिंगोली येथे गट-अ ची ३ गट-क ची १४ व गट-ड ची ३६ अशी एकूण ५३ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. सध्या गट-अ चे १ पद, गट-क ची ५ व गट-ड ची १९ अशी एकूण २५ पदे रिक्त आहेत. गट-अ व क या संवर्गातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. त्यामुळे संस्थेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) गट-अ व गट-क संवर्गातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार देऊन शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन कामे पुर्णत्वास नेली जातात.

(३) पशुसंवर्धन विभागातील राज्यस्तरीय गट-क ची रिक्त पदे भरण्याबाबत एकूण १३८ रिक्त पदे भरण्याबाबत जाहिरात देऊन उमेदवारांची ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात आली आहे.

वित्त विभागाच्या दिनांक २५.५.२०१७ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विभागाच्या सुधारीत आकृतीबंधास उच्च स्तरीय सचिव समितीची मान्यता मिळाल्याशिवाय रिक्त पदे भरता येणार नाही अशी तरतूद असल्याने विभागाचा सुधारीत आकृतिबंधास मान्यता मिळाल्यानंतर पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच गट -ड ची भरती प्रक्रीया प्रादेशिक स्तरावर पूर्ण करण्यात आली असून त्यातून गट-ड ची ५ पदे भरलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर येथील पशुवैद्यकीय केंद्राची इमारतीची दुरुस्ती, सुशोभीकरण तसेच मुबलक औषधी साठा, उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१९) ९६९०२ (२७-१२-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर येथील पशुवैद्यकीय केंद्राची इमारत मोडकळीस आली असून येथील शौचालय, स्वच्छतागृह, संरक्षक भिंत इ. भागाची पडझड झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केंद्रात औषाधींचा नेहमीच तुटवडा, इतर आधुनिक सुविधा नसल्यामुळे पशुपालकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या केंद्राची दुरुस्ती, सुशोभीकरण करण्यासोबतच येथे मुबलक औषधी साठा, उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(i) पशुवैद्यकीय दवाखाना आखाडा बाळापूर, जि.हिंगोली येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची जुनी इमारत मोडकळीस आल्याने सन २०११-१२ मध्ये नविन इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून सन २०१६-१७ मध्ये सदर दवाखान्याची दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

(ii) सद्यस्थितीत या नविन इमारतीमध्ये पशुवैद्यकीय दवाखाना कार्यरत आहे. कार्यालयामध्ये शौचालय, स्वच्छतागृह असून, ते नियमित वापरात आहे.

(iii) इमारतीला संरक्षक भिंत असून, सदर भिंतीची किरकोळ दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून सन २०१७-१८ करीता निधीची मागणी करण्यात आलेली आहे.

(२) व (३) सदर पशुवैद्यकीय दवाखान्याला मुबलक औषध पुरवठा विविध योजनेतून करण्यात आलेला असून त्याचा वापर पशुपालकांच्या पशुधनासाठी दैनंदिन उपचारासाठी केला जातो. तसेच या दवाखान्याच्या कार्यक्षेत्रामधील

सर्व पशुधनांस लसीकरण, कृत्रिम रेतन औषधोपचार, खच्चीकरण, गर्भ तपासणी, वांझ तपासणी इत्यादी सेवा नियमितपणे पुरविल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण किनारपट्टी भागात मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी, निलक्रांती योजना राबविण्यास प्रारंभीक माहिती घेण्याबाबत**

**(२०) ९७०७७ (२७-१२-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टी भागात मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी, पारंपारिक मच्छिमारांना खोल समुद्रात मासेमारी करण्याच्या अत्याधुनिक मोठ्या बोटी देण्यासाठी निलक्रांती योजने अंतर्गत २० कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निधीच्या सहाय्याने आतापर्यंत कोकण किनारपट्टीवरील किती पारंपारिक मच्छिमारांना या माध्यमातून खोल समुद्रात मासेमारी करण्याच्या अत्याधुनिक मोठ्या बोटी देण्यात आल्या,
(३) असल्यास, सदर योजना राबविण्यासाठी प्रारंभीक माहिती घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) बाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बांबळेवाडी ते जुन्नर बससेवा सुरू करण्याबाबत**

**(२१) ९७२४५ (२७-१२-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील मु.बांबळेवाळी (पो.तांबे) ते जुन्नर अशी बससेवा शासनाने मंजूर केलेली असतांना अद्याप बांबळेवाडी ते जुन्नर बससेवा सुरू झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांबे ते बांबळेवाडी हा रस्ता नवीन बनविण्यात आला असून, सदर मार्गावर बसफेऱ्या सुरू करण्यासाठी मार्ग वाहतुकीस योग्य असल्याबाबतची खातरजमा महामंडळाद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती बांबळेवाडी ते जुन्नर अशी बससेवा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) जुन्नर ते बांबळेवाडी या १५.९ कि.मी. अंतरापैकी तांबे (११.९ कि.मी.) पर्यत राज्य परिवहन महामंडळाच्या १६ फेऱ्या चालनात आहेत.

तांबे ते बांबळेवाडी या २ कि.मी. रस्त्यापैकी १.४ कि.मी. रस्ता हा राज्य परिवहन वाहतूकीसाठी योग्य आहे. त्यापुढील रस्ता खराब व अरुंद गाडीवाट असल्याने एस.टी. वाहतूकीस योग्य नाही. सदरच्या लांबीमध्ये रस्ता नव्याने मातीकाम, खडीकरण व डांबरीकरण करावे लागणार आहे. यासाठी अंदाजे रु.२०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. तसेच, सदर लांबीमध्ये रस्त्यासाठी आवश्यक असणारी जमिन ग्रामस्थांनी देणे आवश्यक असल्याबाबत कार्यकारी

अभियंता, जिल्हा परिषद, पुणे यांनी त्यांचे पत्र दि.१४.०७.२०१७ अन्वये, राज्य परिवहन महामंडळास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील एसटी बस स्थानकांवर स्वस्त औषधांची दुकाने (जेनेरिक औषधे) सुरु करण्याबाबत**

**(२२) ९७४९३ (२७-१२-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वसामान्य जनतेला स्वस्त दरात औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी ५९७ एसटी बस स्थानकावर स्वस्त औषधांची दुकाने (जेनेरिक औषधे) सुरु करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी बस स्थानकावरील औषध दुकानात बाजारातील ब्रँडेड औषधांपेक्षा ४० टक्के कमी दराने विकण्याचा निर्णय देखील एसटी महामंडळाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी एसटी महामंडळाने काढलेल्या निविदाना प्रतिसाद न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) उक्त योजनांची अंमलबजावणी त्वरित करण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.

ब्युरो ऑफ फार्मा पब्लिक सेक्टर अंडरटेकिंग ऑफ इंडिया (बीपीपीआय), राज्य परिवहन महामंडळ व महाराष्ट्र शासनाचे आरोग्य खाते यांच्यामध्ये झालेल्या सामज्यस्य करारात जेनेरिक औषधे वाजवी दराने विकण्यात येतील, असे नमूद करण्यात आलेले आहे.
(३) व (४) दि.२५.०७.२०१७ रोजी जेनेरिक औषध विक्री केंद्रे राज्य परिवहन बसस्थानकांवर चालू करण्याकरिता निविदा मागविलेली होती. त्या निविदेस प्रतिसाद मिळाला नसल्याने सदर निविदेबाबत निविदापूर्व बैठकीत इच्छुक निविदाकारांनी केलेल्या सूचनांचा विचार करुन त्याप्रमाणे आवश्यक बदल करुन दि.२०.१२.२०१७ रोजी निविदा पुन:श्च प्रसिध्द करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महानंद डेअरीकडून मुंबईतील दूध वितरकांना कमिशन वाढविण्याबाबत

**(२३) ९७५७४ (२९-१२-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महानंद डेअरीकडून मुंबईतील दूध वितरकांना प्रतिलिटरला २ रुपये ९० पैसे एवढे कमी कमिशन दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामध्ये साडेचार रुपयांपर्यंत वाढ करावी म्हणून वारंवार पाठपुरावा करुनही निर्णय होत नसल्याने वितरकांनी महानंद डिअरीच्या दूधाचे वितरण थांबवून पांच रुपये प्रतिलिटर देणाऱ्या इतर अमूल, नंदिनीसारख्या परराज्यातील ब्रॅण्डचे दूध वितरण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती महानंद डेअरीकडून मुंबईतील दूध वितरकांना कमिशन वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही. सध्या वितरकांना प्रति लिटर रु.३.१५ इतके कमिशन महानंदामार्फत दिले जात आहे.
(२) महासंघांच्या दूध वितरकांनी कमिशन वाढून मिळावे अशी विनंती महासंघास केली आहे हे खरे आहे. मात्र कोणत्याही वितरकाने महानंदाचे दूध वितरण करण्याचे कामकाज थांबविलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यात ११ पशुवैद्यकीय दवाखान्यात अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२४) ९७८८१ (२७-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यात ११ पशुवैद्यकीय दवाखान्यात ११ अधिकारी पदे मंजूर असताना ८ पदेच भरलेली असून ३ पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पशुवैद्यकीय दवाखान्यांतर्गत येणाऱ्या पशुपालकांच्या जनावरांना वेळेवर सेवा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने येथील पशुपालकांच्या जनावरांच्या उपचाराची अडचण लक्षात घेता येथील रिक्त पदांवर पूर्णवेळ पशुवैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०२-२०१८) :** (१) व (२) पुणे जिल्हयातील भोर तालूक्यात श्रेणी-१ चे २ व श्रेणी- २ चे ९ असे एकूण ११ पशुवैदयकीय दवाखाने आहेत. सदर दवाखान्यांकरीता ११ पदे मंजूर असून त्यापैकी ९ भरलेली व २ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपवून पशुपालक धारक शेतकऱ्यांच्या जनावरांना नियमितपणे वैदयकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
(३) पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा भरतीने व पशुधन विकास अधिकारी, गट-ब या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पदांच्या उपलब्धतेनुसार भोर तालुक्यातील पशुवैदयकीय दवाखान्यातील रिक्त पदे भरण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय दूध योजना तोट्यामध्ये सुरु असल्याबाबत**

**(२५) ९८००९ (२९-१२-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय दूध योजना पूर्णपणे डबघाईला आले असून राज्यात सध्या दररोज सुमारे २ कोटी लिटर दुधाचे उत्पादन होते, त्यापैकी शासकीय दूध योजनांच्या माध्यमातून केवळ ४० ते ५० हजार दूध संकलन केले जाते व बाकी सर्व दूध खाजगी संस्था सहकारी संघ-संस्था यांचे मार्फत (सुमारे दीड कोटी लिटर) संकलन केले जाते, असे दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय उपक्रम यांच्याकडे सुमारे ४ हजार एकर जमीन असून सुमारे १४ हजार कर्मचारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, साडेचार हजार कोटी रुपयांचा तोटा, कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्ती वेतन, भत्ते, ३८ शासकीय दूधयोजना १८१ शितकरण केंद्रे, याबाबत शासनाचे कोणते धोरण आहे, तसेच धोरण ठरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२३-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राज्यात सद्यस्थितीत दररोज सुमारे २.७० कोटी दुधाचे उत्पादन होते, त्यापैकी शासकीय दूध योजनांच्या माध्यमातून १ लाख लि. दुधाचे संकलन होते.
(२) हे खरे नाही.

दुग्धव्यवसाय विकास विभागाकडे एकूण १४,०७८.२६ एकर जमीन होती. त्यापैकी ५४८१.७६ एकर जमीन इतर विभागांना हस्तांतरीत करण्यात आली आहे /भाडेपट्टयाने देण्यात आली आहे व उर्वरीत ८,५९६.५ एकर जमीन शिल्लक आहे. तसेच सद्यस्थितीत दुग्धव्यवसाय विकास विभागात १४ हजार कर्मचारी नाहीत. एकूण ४०९७ पदे मंजूर असून, २२८३ पदे भरलेली आहेत.
(३) शासनाच्या दुग्धव्यवसाय विभागातील तोटा आणखी वाढू नये व शासकीय दुग्धशाळा व शितकरण केंद्राचे पुनर्जिवन व्हावे यासाठी बंद पडलेल्या व बंद पडण्याची शक्यता असलेल्या शासकीय दूध योजना व शितकरण केंद्रे सार्वजनिक-खाजगी सहभाग (पी.पी.पी.) तत्वावर पुनरुज्जीवन करण्यास व विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून अहवाल सादर करण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यास दि.२८/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवलापार (ता.रामटेक) येथे पशुसंवर्धन प्रकल्प तातडीने सुरु करणेबाबत.**

**(२६) ९८३४८ (२९-१२-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवलापार, (ता.रामटेक) येथे पशुसंवर्धन प्रकल्प होणार होता परंतु अद्यापही सुरू करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती देवलापार, (ता.रामटेक) येथे पशुसंवर्धन प्रकल्प सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई सेंट्रल एसटी महामंडळाचे विश्रामगृहे, उपहारगृह व प्रसाधनगृहांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत**

**(२७) ९८३४९ (२७-१२-२०१७). श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई सेंट्रल एस.टी. महामंडळाचे मुख्यालय असून येथील ड्रायव्हर व कंडक्टर यांच्यासाठीची विश्रामगृहे, उपहारगृह व प्रसाधनगृहांची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे ड्रायव्हर व कंडक्टर यांची गैरसोय होत असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदरहू विश्रामगृहे, उपहारगृह व प्रसाधनगृहांची तातडीने दुरुस्ती करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील एस.टी. बस स्थानकात स्वच्छता ठेवण्याबाबत**

**(२८) ९८३६९ (२७-१२-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील एस.टी. बस स्थानकांत नेहमीच अस्वच्छता असुन सर्व बस स्थानक परिसरात सुरक्षा रक्षकच कामावर नसल्याचेही निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत शहरातील सर्वच एस.टी. बस स्थानकांची पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीअंती नाशिक शहरातील एस.टी. बस स्थानकात स्वच्छता ठेवण्याबाबत तसेच सुरक्षा रक्षकावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे नाशिक शहरातील सर्व बसस्थानकांच्या स्वच्छतेबाबत व सुरक्षा रक्षकांच्या कामगिरीबाबत वेळोवेळी तपासणी करण्यात येत आहे.

तसेच, बसस्थानक स्वच्छता परिचलनासाठी एकात्मीक सुविधा व्यवस्थापन मे.ब्रिक्स इंडिया प्रा.लि. पुणे या कंपनीद्वारे संपूर्ण बसस्थानकांची स्वच्छता करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महानंद डेअरी व शासकीय डेअरींना अनुदान देण्याबाबत व दर कमी करण्याबाबत**

**(२९) ९९०३५ (२९-१२-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानंद डेअरी आणि शासन यांच्यामध्ये दुधाचा खरेदी दरावरून मतभेद असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांकडून खरेदी केल्या जाणाऱ्या प्रितिलीटर दुधाला शासनाने जाहीर केलेल्या २७ रुपये दर देणे महानंदाला परवडत नसून शासनाने अनुदान द्यावे व दर कमी करावा अशी मागणी केली आहे ही मागणी शासनाने मान्य न केल्यास महानंद डेअरीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती अनुदान देण्याबाबत व दर कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९ अ अंतर्गत शासनाने दि.१० जुलै, २०१५ रोजी निर्गमित केलेल्या निदेशानुसार सहकारी दूध संघांनी शासनाने शासकीय दूध योजनेकरिता निश्चित केलेले दूध खरेदी दर देणे बंधनकारक आहे. सदर निदेश शेतकऱ्यांचे हित लक्षात घेवून निर्गमित करण्यात आले आहेत. मात्र सदर दर न देता कमी दराने महानंदाकडून शेतकऱ्यांना दुध खरेदी दर देण्यात येवून त्यासाठी अनुदान देण्यात यावे अशी मागणी महानंदाकडून शासनास करण्यात आली आहे हे खरे आहे.

(३) सध्याचा राज्यातील दूधाचा पुष्टकाळ लक्षात घेवून, डिसेंबर व जानेवारी, २०१७ या २ महिन्याच्या कालावधीसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९अ अंतर्गत दि.१० जुलै, २०१५ रोजी निर्गमित केलेल्या निदेशानुसार देण्यात आलेल्या नोटिसांना शासनाने स्थगिती दिली आहे. या २ महिन्याकरीता शासनाचे दूध खरेदी दराचे बंधन शिथिल करण्यात आले असल्याने शासनाने अनुदान देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील शिरूर पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत वैयक्तीक लाभाच्या योजनेतून शेतकऱ्याची फसवणूक करण्यात आल्याबाबत**

**(३०) ९९०६८ (२९-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शिरूर पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत वैयक्तीक लाभाच्या योजनेतून लाभदारक शेतकऱ्याला कमी दर्जाच्या शेळ्या देऊन फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार दिनांक १५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरूर तालुक्यातील न्हावरे येथील संजय वाघमोडे या लाभार्थ्याला प्रकरण मंजूर झाले म्हणून बँकेच्या खात्यात ५० टक्के रक्कम भरण्यास शिरूर पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या लाभार्थ्याने आईचे सोने गहान ठेऊन ५० टक्के रक्कम बँकेत भरली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधीत अधिकाऱ्यांनी कमी दर्जाच्या १० शेळ्या एक बोकड कानाला बिल्ले मारून लाभार्थ्याने त्या घरी आणल्यानंतर त्यातील दोन शेळ्या लगेच मरण पावल्या, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२२-०१-२०१८) :** (१) नाही.

(२), (३) व (४) (१) श्री.संजय आप्पा वाघमोडे, न्हावरा, ता. शिरूर, जि.पुणे याची सन २०१७-१८ या वर्षामध्ये दिनांक ७ जुलै, २०११ च्या शासन निर्णयानुसार अंशत: ठाणबंद पध्दतीने ५० टक्के अनुदानावर (१० + १ शेळी गट) या राज्यस्तरीय योजनेअंतर्गत निवड झाली होती.

(२) उक्त शासन निर्णयानुसार सदर लाभार्थ्याने ५० टक्के लाभार्थी हिस्सा रू.४३९२९/- एवढी रक्कम फेब्रुवारी २०१७ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेतून जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जि.पुणे यांच्या खात्यावर जमा केली.

(३) त्यानंतर दिनांक १७.६.२०१७ रोजी शिरून कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरूर येथे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) व पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना, न्हावरा तसेच विमा प्रतिनिधी यांच्या समक्ष लाभार्थ्याच्या पसंतीने (१०+१) शेळी गटाची खरेदी करण्यात आली.

(४) तद्नंतर दिनाक ६.७.२०१७ रोजी लाभार्थी श्री.वाघमोडे यांच्या दोन शेळ्या आजारी पडल्यानंतर पशुवैद्यकीय अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना, न्हावरा यांनी लाभार्थीच्या घरी जाऊन उपचार केले. परंतु दिनांक ११.७.२०१७ रोजी दोन शेळ्या मृत पावल्या. सदर शेळी गटाला विमा संरक्षण असल्याने मृत पावलेल्या शेळ्यांचा दावा विमा कंपनीकडून मंजूर करून घेण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड येथील परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती बसस्थानकातील खड्डे बुजविण्याबाबत**

**(३१) ९९३७९ (२७-१२-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती बसस्थानकात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले असून त्यामुळे प्रवाशांना त्रास होत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्थानकाबाहेरील महापालिकेच्या रस्त्यावर व बस बाहेर निघण्याच्या मार्गावरही खड्डे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील खड्डयांमुळे येथील बसेस वारंवार नादुरुस्त होत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती नांदेड येथील परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती बसस्थानकातील खड्डे बुजविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) नाही.

(४) नांदेड बसस्थानकावरील खड्डे ऑक्टोबर, २०१७ मध्ये बुजविण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एस.टी. महामंडळाच्या नांदेड विभाग तर्फे चालवविण्यात येणारे मानव विकास मिशनच्या बसेस देगलुर तालुक्यात नसल्याने विदयार्थ्यांचे होत असलेले नुकसान**

**(३२) ९९३९१ (२९-१२-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.टी. महामंडळाच्या नांदेड विभाग नियंत्रकांनी नुकतेच ज्या मार्गावर मानव विकास मिशनच्या बसेस चालविण्यात येत नाहीत किंवा जे मार्ग या योजनेत मंजूर नाहीत त्या मार्गावर दिले गेलेले बस पासेस रद्द करुन परत घेण्याचे आदेश दिले असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांत्रिकदृष्टया वरिल प्रश्न भाग १ मधील आदेश योग्य असले तरीत त्यामुळे देगलुर तालुक्यातील ८९ विदयार्थीनींचे शिक्षणाचे नुकसान होत असुन नांदेड जिल्हयातील बहुतेक ग्रामीण भागातील मुली आठवीनंतरचे शिक्षण केवळ वाहतुकीची सोय नसल्याने घेऊ शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देगलुर तालुक्यात शासनाने वाहतुकीची सोय करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) देगलूर तालुक्यातील इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या ८९ विद्यार्थीनींना राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसद्वारे “अहिल्याबाई होळकर” योजनेअंतर्गत १०० टक्के सवलतीच्या मासिक पासेसचे व १० वी पुढील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना “विद्यार्थी मासिक पास” या योजनेतंर्गत ६६.६६ टक्के सवलतीच्या मासिक पासेसचे वाटप करण्यात आलेले असून, कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागातील सर्व आगारांमार्फत ग्रामीण भागातील विद्यार्थी/विद्यार्थीनींना शिक्षणासाठी शालेय फेऱ्या व प्रवासी फेऱ्यांद्वारे नियमित सेवा दिली जात असून, विद्यार्थी व शैक्षणिक संस्थांच्या मागणीनुसार वाढीव फेऱ्या किंवा नविन मार्गावरील फेऱ्या वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यासह राज्यातील गवळी समाजाच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत

**(३३) ९९४७९ (१२-०१-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यासह राज्यातील गवळी समाजाला दुग्ध व्यवसायासाठी शासनाने आर्थिक मदत करण्याबाबतच्या मागण्या शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे जिल्ह्यातील मोहाडी परिसरात या समाजाच्या स्मशानभूमीसाठी त्वरित जागा देण्यात यावी, अशी ही एक मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२१-०२-२०१८) :** (१) दुग्ध व्यवसायासाठी आर्थिक मदत मिळण्याबाबतची कोणतीही मागणी राज्यातील गवळी समाजाकडून दुग्धव्यवसाय विभागास प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) अशी कुठलीही मागणी दुग्धव्यवसाय विभागास प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील बसस्टॅण्ड मधील महिला स्वच्छतागृहाची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत**

**(३४) ९९७६२ (२७-१२-२०१७). डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील नवीन सीबीएस, जुने सीबीएस, मेळा, महामार्ग आणि निमाणी असे चार बसस्टॅण्ड असून तेथे एसटी महामंडळाच्या वतीने महिला स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे स्वच्छतागृह केवळ नावाला असून देखभाल दुरुस्तीची कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यातच या स्वच्छतागृहाबाहेर उभ्या सेविकास दोन ते पाच रुपये घेतल्याशिवाय महिलांना आत प्रवेश देत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती नाशिक शहरातील नवीन सीबीएस, जुने सीबीएस, मेळा, महामार्ग आणि निमाणी असे चार बसस्टॅण्ड असून तेथे एसटी महामंडळाच्या वतीने महिला स्वच्छतागृहाची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) नाशिक शहरातील राज्य परिवहन महामंडळाच्या नवीन सीबीएस व निमाणी बसस्थानकावरील स्वच्छतागृहाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी वाल्मिक मेहतर मागासवर्गीय महिला क्रांती सेवा या खाजगी संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच, जुने सीबीएस व महामार्ग या बसस्थानकांवरील स्वच्छतागृहाच्या देखभाल दुरुस्तीसाठी सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन या खाजगी संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर दोन्ही संस्थांना महिलांकडून शुल्क न आकारण्याबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या असून, त्यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यात कृषी विभागात**
**६७ पदांपैकी २१ पदे रिक्त असल्याबाबत**

**(३५) ९९८७५ (२७-१२-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यात कृषी विभागात ६७ पदांपैकी २१ पदे रिक्त असल्यामुळे विभागाच्या योजना राबविण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच या कार्यालयातील बहुतांश कर्मचारी मुख्यालयी रहात नसून ते कार्यालयात गैरहजर रहात असल्यामुळे येथील शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने येथील रिक्त पदे भरण्यासोबतच येथील अधिकारी कर्मचारी यांना मुख्यालयी राहण्यासाठी निर्देश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०१-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

तालुका कृषि अधिकारी, मोर्शी जि.अमरावती अंतर्गत तालुका कृषि अधिकारी १ पद, मंडळ कृषी अधिकारी १ पद व कृषी सहाय्यकांच्या ७ पदांसह इतर १९ पदे रिक्त आहेत. तथापि, रिक्त पदांचा अतिरिक्त पदभार इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यात येत आहेत.

(२) व (३) अधिकारी/ कर्मचारी यांना मुख्यालयी राहण्यासाठी कार्यालयीन व क्षेत्रीय स्तरावरील उपस्थितीबाबत आयुक्तालय स्तरावरून दिनांक ०८ मार्च, २०१६ रोजी परिपत्रक निर्गमित करून त्याव्दारे आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील ७९ पदांचे मागणीपत्र लोकसेवा आयोगास सादर केलेले आहे. कृषि पर्यवेक्षक संवर्गातील ६० कर्मचाऱ्यांना कृषि अधिकारी पदावर पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाले आहेत.

कृषि सहाय्यक संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील ७३० रिक्त पदी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याची कार्यवाही विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर सुरु आहे त्याचप्रमाणे कृषि सहाय्यक संवर्गातील दिनांक ३१.१२.२०१८ अखेरची संभाव्य रिक्तपदे विचारात घेता सरळसेवेची एकूण ९०८ पदे भरण्यासाठी जाहिरात विज्ञापीत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा मतदार संघातील (जि.जळगांव) अडावद (ता.चोपडा), किनगांव साकळी (ता.यावल) या मंडळातील फळपिक विमा योजनेंतर्गत समान रक्कम देण्याबाबत**

**(३६) १००२४१ (२७-१२-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा मतदार संघातील (जि.जळगांव) अडावद (ता.चोपडा), किनगांव साकळी (ता.यावल) या मंडळातील हवामान आधारीत फळपिक विमा योजना सन २०१६-१७ अंतर्गत शेतकऱ्यांना ११,५००/- रुपये हेक्टरी पिक विम्याची रक्कम मंजूर झालेली असतांना लगतच्या मंडळाला २८,७५०/- रुपये एवढी मदत मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंडळातील पिक विम्याच्या योजनेत एवढ्या मोठ्या प्रमाणात तफावत असल्याची कारणे काय आहेत तसेच याबाबतची माहिती विमा कंपनीकडून देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पिक विम्याच्या रक्कमेत तफावत करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच सर्व मंडळातील फळपिक विमा योजनेंतर्गत समान रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०१-०३-२०१८) :** (१) होय खरे आहे.

(२) महसूल मंडळामध्ये संबंधित स्वयंचलित हवामान केंद्राकडून प्राप्त प्रमाणित आकडेवारी व फळपिकाचे हवामान धोक्या बाबतचे निकष यावर भरपाईची रक्कम निश्चित होते. महसूल मंडळातील हवामान तफावतीमुळे विमा नुकसान भरपाईमध्ये तफावत दिसून येत आहे. जळगांव जिल्ह्यामधुन तफावती बाबत कसल्याही प्रकारची विचारणा केल्याचे पत्र बजाज विमा कंपनीस प्राप्त झालेले नाही. विमा कंपनीने क्लेम पेमेंटच्या बाबतची माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व जिल्हाधिकारी जळगांव यांना पाठविली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवेबाबत**

**(३७) १००४७५ (२७-१२-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील शहर बस सेवा एसटी महामंडळातर्फे केवळ पाच मार्गावर चालविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील अन्य मार्गावर एसटी बस सेवा चालविण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक शहरात बस सेवा महानगरतर्फे अथवा एसटी महामंडळातर्फे चालविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवकाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) व (२) नाही.
(३) सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाद्वारा नाशिक शहर परिसरात शहर बस फेऱ्यांचे एकत्रिकरण व सुसूत्रीकरण करुन सर्व मार्गावर एकूण ५४२ फेऱ्या चालविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व कडा (जि.बीड) येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकाच्या नुतनीकरणाच्या कामाबाबत**

**(३८) १००६०२ (२७-१२-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी, पाटोदा व कडा (जि.बीड) येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे बसस्थानकाची दुरवस्था झाली असल्याने सदर बस स्थानकांच्या नूतनीकरण करण्याची मागणी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी हे सातत्याने शासनाकडे करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर मागणीच्या अनुषंगाने आष्टी, पाटोदा व कडा येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांच्या नुतनीकरणाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाने आष्टी, पाटोदा व कडा या बसस्थानकांच्या नुतनीकरणासाठी/पुनर्बांधणीसाठी तज्ञ वास्तुविशारद यांची नियुक्ती केलेली असून, त्यांच्याद्वारे बसस्थानक नुतनीकरण/पुनर्बांधणीसाठीचे नकाशे तयार करुन घेतले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील पशुर्वैद्यकीय फिरते दवाखाने सुरू करण्याबाबत**

**(३९) १००६१२ (२९-१२-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यात पशुधनाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जिल्हयात पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. यामध्ये ११ फिरते दवाखाने आहेत. मात्र वाहनदुरूस्ती नसल्याचे कारण सांगून पशुवैद्यकीय दवाखाने बंद असल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फिरत्या दवाखान्यामध्ये पशुधन विकास अधिकारी, सहायक पशुधन विकास अधिकारी, परीचर अशी ३ कर्मचाऱ्याची नियुक्ती केलेली असते. या ३३ कर्मचाऱ्याचे वेतन फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यात कार्यरत असल्याचे दाखवुन काढण्यात येते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती बंद पडलेले पशुवैद्यकीय फिरते दवाखाने परत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) १) पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय १, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय ७, पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-१ चे ४६, पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-२ चे १३५ व फिरते पशुवैद्यकीय दवाखाने १२ असे एकूण २०१ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत.

२) सन २००० मध्ये सदर १२ फिरते पशुवैद्यकीय दवाखाने १२ वाहनासह जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आले होते. सदर दवाखान्यामार्फत उपलब्ध असलेल्या वाहनातून पशुवैद्यकीय सेवा पुरविल्या जात होत्या. परंतु दि. ०४/०२/२०१५ रोजी सदर १२ वाहने निर्लेखीत करण्यात आली आहेत. वाहन निर्लेखनानंतर नविन वाहनांची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे करण्यात आली आहे.

३) जिल्ह्यातील १२ फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी प्रत्येकी एक पशुधन विकास अधिकारी, एक सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, एक परिचर व एक वाहन चालक अशी एकूण ४ पदे मंजुर आहेत. यवतमाळ येथील १२ फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी एकूण ४८ पदे मंजुर आहेत व त्यांचे वेतन त्याच दवाखान्यावरील तरतुदी मधून काढण्यात येते. पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी हे स्वत: /सार्वजनिक वाहनाने नेमुन दिलेल्या मार्गावर दौरे करुन पशुपालकांना नियमीत पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पशुसंवर्धन विभागाच्या आयुक्तालयाकडून लाळ खुरकत रोग प्रतिबंधक लसीचा (एफएमडी) पुरवठा राज्यात करण्याबाबत

**(४०) १०१०५७ (२९-१२-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पशुसंवर्धन विभागाच्या आयुक्तालयाकडून लाळ खुरकत रोग प्रतिबंधक लसीचा (एफएमडी) अद्यापी कोणत्याही जिल्ह्याला पुरवठा न झाल्याने राज्यातील सुमारे ३ कोटी ५२ लाख पशुधनाच्या जीविताचा प्रश्न उपस्थित झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापही लाळ खुरकत रोग प्रतिबंधक लसीचा पुरवठा राज्यात न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या लसीचा पुरवठा राज्यात तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०८-०२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे असून, संन २०१७-१८ मध्ये माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर या महिन्यात बीड, उस्मानाबाद, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयातील साखर कारखाने क्षेत्र, उस तोडीसाठी स्थलांतरीत होणारी जनावरे तसेच राज्याच्या सीमावर्ती भागातील जनावरांना लसीकरण करण्यासाठी एकूण ५, २३,००० लस मात्रा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच अहमदनगर जिल्हयात जिल्हा परिषद स्वनिधीमधून एकूण ८४,७१० लाळ खुरकुत रोगप्रतिबंधक लस मात्रा खरेदी करण्यात आलेल्या आहेत.
(२) निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक अडचण आल्यामुळे लाळ खुरकुत रोग प्रतिबंधक लसीचा पुरवठा होवू शकलेला नाही.
(३) लाळ खुरकुत रोग प्रतिबंधक लसमात्रा उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगमेश्वर (रत्नागिरी) तालुक्यातील राज्य परिवहन देवरुख आगारात विविध ११७ पदे रिक्त असलेबाबत

**(४१) १०२०३३ (२७-१२-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर (रत्नागिरी) तालुक्यातील राज्य परिवहन देवरुख आगारात विविध ११७ पदे रिक्त असल्यामुळे प्रवाशांच्या सेवेत व्यत्यय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) नाही.
राज्य परिवहन महामंडळाच्या देवरुख आगारात विविध संवर्गातील एकूण मंजूर ५१७ पदांपैकी १३९ पदे रिक्त आहेत. परंतू त्याचा प्रवासी सेवेत कसलाही व्यत्यय आलेला नाही.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत चालक तथा वाहक (कनिष्ठ), सहाय्यक (कनिष्ठ), लिपिक-टंकलेखक (कनिष्ठ) व पर्यवेक्षकीय पदांची भरती प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर एसटी डेपो ते खुनेश्वर पर्यत एस.टी. बस सुरु करणेबाबत**

**(४२) १०२२१८ (२७-१२-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर एसटी डेपो ते खुनेश्वर पर्यत एस.टी. बस सुरु करणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.परिवहन मंत्री, यांच्याकडे लेखी मागणी केल, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सोलापूर एसटी डेपो ते खुनेश्वर पर्यत एस.टी. बस सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) होय.

(२) सोलापूर बस आगार ते खुनेश्वर ही बस दि.०६.०१.२०१८ पासून सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील लोहारा तालुक्याच्या निर्मितीपासून पं.स. लोहारा अंतर्गत पशुधन विकास अधिकारी हे पद रिक्त असलेबाबत**

**(४३) १०२४४८ (२९-१२-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील लोहारा तालुक्याच्या निर्मितीपासून ते आजतागायत पं.स.लोहारा अंतर्गत तालुका पशुधन विकास अधिकारी हे पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जि.उस्मानाबाद तालुक्यात शेतीला पूरक म्हणून शेतकरी पशुपालन व्यवसाय करतात यामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात पशुधन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लोहारा तालुक्यातील श्रेणी १ व श्रेणी २ च्या ८ पशुचिकित्सालयामध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह अनेक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना यांनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर सर्व रिक्त पदे भारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) उस्मानाबाद जिल्हयातील लोहारा या नवनिर्मित तालुक्याकरीता पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती (विस्तार) हे पद निर्माण करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर पद भरण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, लोहारा तालुक्यात जिल्हा परिषद अंतर्गत श्रेणी-१ चा दवाखाना असून तेथील पशुधन विकास अधिकाऱ्याचे पद सद्यस्थितीत रिक्त आहे.
(२) हे खरे आहे.
(३) लोहारा तालुक्यात श्रेणी-१ च्या ४ व श्रेणी -२ च्या ४ अशा एकूण ८ पशुवैद्यकीय संस्था कार्यरत आहेत. सदर ८ संस्थामध्ये एकूण २६ मंजूर पदे असून त्यापैकी २३ भरलेली व ३ पदे रिक्त आहेत.
(४) व (५) हे खरे आहे.

गट-क व गट-ड संवर्गातील पदे ही जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येत असल्याने सदर संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा भरतीने व पशुधन विकास अधिकारी, गट-ब या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु असून सदर कार्यवाही

पूर्ण झाल्यानंतर पदांच्या उपलब्धतेनुसार लोहारा येथील पशुधन विकास अधिकाऱ्याचे रिक्त पद भरण्यात येईल. सद्यस्थितीत सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून पशुपालकधारक शेतकऱ्यांच्या जनावरांना नियमितपणे वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील एस.टी. महामंडळाच्या सदनिका धोकादायक असल्याबाबत**

**(४४) १०२७३७ (२९-१२-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या सदनिका धोकादायक घोषित करण्यात आल्या असून त्यांना नोटिस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोटिस देवूनही १२५ घरा पैकी फक्त १० ते १५ घरे रिकामी करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती घरे रिकामी करण्याबाबत तसेच धोकादायक घरे न सोडणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाद्वारे औरंगाबाद विभागीय कार्यालयाजवळील ६४ व औरंगाबाद मध्यवर्ती बसस्थानक परिसरातील ३२ अशा एकूण ९६ सदनिका असलेल्या इमारती धोकादायक असल्याचे घोषित करण्यात आले

आहे. त्यानुसार तेथे रहात असलेल्या कर्मचाऱ्यांना सदनिका रिकाम्या करण्याबाबत महामंडळाद्वारे दोन नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत २८ सदनिका कर्मचाऱ्यांनी रिक्त केल्या असून, उर्वरित सदनिका रिक्त करण्याबाबत दुसरी नोटीस बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तलासरी बस आगारातून लांब पल्याच्या नव्या व जादा बसफेऱ्या सुरु करण्याबाबत**

**(४५) १०२८७१ (२९-१२-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तलासरी बस आगारातून मोजक्या बस फेऱ्या सुरु असल्याने विद्यार्थ्यांना, स्थानिकांना खाजगी वाहनातून धोकादायक प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती आगारातून लांब पल्याच्या नव्या व जादा बसफेऱ्या सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१), (२) व (३) तलासरी बसस्थानक डहाणू आगारांतर्गत सप्टेंबर, २०१७ पासून कार्यान्वित झालेला आहे. सदर बसस्थानकावरुन दिवसभरात एकूण ९४ फेऱ्यांद्वारे प्रवाशांना सेवा दिली जाते. त्यामुळे तलासरी येथील विदयार्थी व प्रवाशांची गैरसोय झालेली नाही.

तलासरी हा पालघर जिल्हयातील दुर्गम परिसर असल्याने लांब पल्ला बससेवेस अपेक्षित प्रवासी प्रतिसाद मिळत नाही.

सद्यस्थितीत तलासरी तालुक्यातून वाढीव बसफेऱ्यांची मागणी होत आहे. परंतू, महामंडळामध्ये चालक/वाहक कर्मचाऱ्यांची मोठया प्रमाणात कमतरता असून, भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबड (जि.जालना) तालुक्यातील लघु पशुवैद्यकीय सर्व कार्यालय बंद असल्याबाबत**

**(४६) १०३३८१ (२९-१२-२०१७). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबड (जि.जालना) तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयाच्या पाठीमागे शासनाने लाखो रुपये खर्च करून तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयांची भव्य अशी सर्व सोईंनीयुक्त इमारत बांधली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात ग्रामीण भागातील शेतकरी, पशुपालक मोठ्या अपेक्षेने येत असतात परंतु अनेकदा हे चिकित्सालयाचे कार्यालय बंद असते तर पशुवैद्यकीय तज्ञांच्या प्रतिक्षेत कित्येक तास शेतकरी, पशुपालक यांना ताटकळत बसावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू रुग्णालय वारंवार बंद असण्याची व पशुवैद्यकीय तंज्ञ वेळेवर उपस्थित नसल्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, तातडीने हे पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय सुरू ठेवून शेतकरी, पशुपालकांच्या पशुधनाला त्याचा फायदा करून देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४), व (५) तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, अंबड ही राज्यस्तरीय संस्था असून,या ठिकाणी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, वरिष्ठ लिपिक, व्रणोपचारक व शिपाई यांचे प्रत्येकी १ पद अशी एकूण ५ पदे मंजूर आहेत.यापैकी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, व्रणोपचारक व शिपाई ही पदे सध्या रिक्त आहेत. तसेच या सर्व चिकित्यालयाच्या अंतर्गत श्रेणी-२ चे एकुण ८ दवाखाने असून यासाठी ८ पशुधन पर्यवेक्षक व ८ परिचर यांची पदे मंजूर आहेत. या चिकित्यालयाच्या अंतर्गत एकूण १८ गावांचा समावेश आहे. या पशुवैद्यकीय सर्वचिकित्यालयातील तसेच श्रेणी-२ च्या दवाखान्यातील कार्यरत पशुवैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून परिसरातील पशुपालकांना नियमित स्वरूपात पशुवैद्यकीय सेवा पुरविल्या जात आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बदनापूर (जि.जालना) येथील पशुवैद्यकीय रुग्णालयाची इमारत दुरुस्ती करून तातडीने रिक्त पदे भरण्याबाबत

**(४७) १०३३८२ (२९-१२-२०१७). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदनापूर (जि.जालना) येथील पशुवैद्यकीय रुग्णालयाची अवस्था दयनिय झाली असून या रुग्णालयांतर्गत ९० गावांचा समावेश असून ११ पदे रिक्त असल्याने चौघांवर या रुग्णालयाची जबाबदारी असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयाची इमारत अतिशय जीर्ण झाली असून मोडकळीस आली आहे व रुग्णालयाच्या आवारात नागरिक अस्वच्छता पसरवत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उक्त पशुवैद्यकीय रुग्णालयाची इमारत दुरुस्ती करून तातडीने रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) १. बदनापूर (जि.जालना) येथील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन पर्यवेक्षक व शिपाई ही पदे रिक्त आहेत. त्यामुळे तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाचा संपूर्ण कारभार पशुधन विकास अधिकारी हे सांभाळत आहेत.

तालुका लघु पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या अंतर्गत १२ गावांचा समावेश असून या चिकित्सालयाच्या अंतर्गत श्रेणी-२ चे ५ पशवैद्यकीय संस्था आहेत. या श्रेणी-२ च्या दवाखान्याअंतर्गत २७ गावांचा समावेश आहे.

२. उक्त पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय व पशुवैद्यकीय संस्थांसाठी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांचे १ पद, ५ पशुधन पर्यवेक्षक व ५ परिचर अशी पदे मंजूर आहेत. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या रिक्त पदाचा अतिरीक्त कार्यभार पशुधन विकास अधिकारी, बदनापूर यांच्याकडे देण्यात आलेला आहे. श्रेणी-२ च्या ५ दवाखान्यांतर्गत पशुधन पर्यवेक्षकांची २ व परिचरांची ५ पदे रिक्त आहेत. रिक्त पशुधन पर्यवेक्षक पदांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. कार्यरत कर्मचाऱ्यांकडून पशुधनांना नियमितपणे उपचार व सेवा पुरविण्यात येतात.

(२) १. तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, बदनापूर या इमातरीचे बांधकाम १९८३ च्या दरम्यानचे असून सध्या इमारत जरी जीर्ण झालेली असली तरी धोकादायक स्थितीत नाही.

२. सदर इमारत लोकवस्तीमध्ये असल्यामुळे काही प्रमाणात अस्वच्छता दिसून येते. परंतु दवाखाना व परिसर दररोज स्वच्छ ठेवण्यात येतो.

(३) १. पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रीया सुरू आहे.

२. तसेच नवीन इमारत बांधण्यासाठी तहसीलदार यांच्याकडे आवश्यक जागेची मागणी करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चिखली व देऊळगांव राजा (जि.बुलढाणा) येथील बसस्थानकाचा विकास होण्यासाठी बी.ओ.टी. तत्वावर काम सुरू करण्याबाबत

**(४८) १०३५८२ (२७-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली व देऊळगांव राजा (जि.बुलढाणा) येथील राज्य परिवहन महामंडळाचे बसस्थानक नागपुर पुणे महार्गावर आहे, गेल्या कित्येक वर्षापासून डांबरीकरण न झाल्याने बससेच्या येण्याजाण्यामुळे धुळ उडून वयोवुध्द महिला, पुरूष विशेषत लहान मुले यांना श्वसनामध्ये धुळीचे कण शरीरात गेल्याने जिवघेणा त्रास सहन करावा लागत असल्याने चिखली व देउळगांव राजा येथील बसस्थानक विकासासाठी बि.ओ.टी तत्वावर काम होण्याची प्रक्रीया सुरू असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिखली व देउळगांव राजा बसस्थानकाचा विकास होण्यासाठी बी.ओ.टी. तत्वावर काम सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०३-२०१८) :** (१) नाही.

(२) चिखली व देऊळगांवराजा येथील बसस्थानकाचा विकास बी.ओ.टी. तत्वावर प्रस्तावित करण्यात आलेला नाही.

चिखली येथील बसस्थानकाची दुरुस्ती व रंगरंगोटी करण्याबाबतच्या कामासाठीची ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे. तसेच, देऊळगांवराजा येथील बसस्थानकाचे आधुनिकीकरणाचे आराखडे तयार करण्यासाठी महामंडळाच्या पॅनेल वास्तुविशारदाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या सेसमध्ये पशू वैदयकीय केंदाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी ३० लाख रुपये उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४९) १०३७७४ (२९-१२-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या सेसमध्ये पशू वैदयकीय केंद्राच्या देखभाल व दुरुस्तीसाठी सुमारे १० लाख रुपयांचे तरतूद आहे मात्र या निधीतून देखभाल दुरुस्ती करण्यास पैसे अपुरे पडत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील पशुसंवर्धन समितीने शासनाने ३० लाख रुपये द्यावेत असा ठराव करुन शासनास पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती समितीच्या या ठरावावर शासनाने निर्णय घेऊन येथे पशू वैदयकीय केंद्राच्या देखभाल दुरुस्तीसाठी ३० लाख रुपये उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा परिषद पशुवैद्यकीय दवाखाने दुरूस्तीसाठी रू.२०.०० लक्ष अनुदानाची मागणी करण्यात आली होती.

परंतु, नाशिक जिल्हा परिषदेच्या सेसमध्ये पशुवैद्यकीय केंद्राच्या देखभाल दुरूस्तीसाठी रू.१०.०० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दुध प्रक्रिया व उत्पादक संघाच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(५०) १०४०२२ (२९-१२-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुध प्रक्रिया व उत्पादक संघाने तूप व बटर यावर आकारण्यात येत असलेला जीएसटी च्या दराबाबत शासनाने फेरविचार करावा, दुध खरेदी दारासाठी अनुदान देण्यात यावे, सहकारी दुध संघावर दुध दराबाबत सक्ती करू नये आशा अनेक मागण्यासाठी दुध खरेदी बंद करण्याचा इशारा दिल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर, २०१७ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दुध प्रक्रिया व उत्पादक संघाच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०७-०२-२०१८) :** (१) दूध खरेदी दरासाठी अनुदान देणे, दूध दराबाबत सक्ती न करणे इत्यादी स्वरुपाच्या मागण्या राज्यातील सहकारी दूध संघांकडून शासनास करण्यात आल्या होत्या हे खरे आहे.

(२) होय, यासंदर्भात मा.मंत्री (पदुम) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.९/११/२०१७ रोजी राज्यातील सहकारी दुध संघांच्या अडीअडचणीवर चर्चा होण्यासाठी बैठक घेण्यात आली होती.

(३) व (४) राज्यात दुग्धव्यवसाय शासन,सहकार व खाजगी या तिन्ही क्षेत्रामार्फत केला जात आहे. यामध्ये शासनाचा सहभाग केवळ ०.५ ते १.०० % इतकाच आहे. खाजगी क्षेत्राचा सहभाग हा ६०% आहे. दूधाकरीता किमान आधारभूत किंमत निश्चित नसल्याने सद्यस्थितीत खाजगी क्षेत्रावर शासनाचे कायद्यानुसार बंधन नाही. खाजगी दूध क्षेत्र कमी दराने दूध खरेदी करत असल्याने तसेच दूधाकरीता पुष्टकाळ सुरु असल्याने डिसेंबर, २०१७ व जानेवारी,२०१८ या २ महिन्याच्या कालावधीकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९अ अंतर्गत शासनाने दि. १० जुलै, २०१५ रोजी निर्गमित केलेल्या निदेशानुसार देण्यात आलेल्या नोटिसांना शासनाने स्थगिती दिली आहे. या २ महिन्यात राज्यातील सहकारी दूध संघांनी बाजारभावानुसार दूधाची खरेदी केली असल्याने अनुदान देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** 
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.